ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख १८ एप्रिल, १९६२ | अंक ८

## विविध माहिती

**मुंबई-मास्को विमानप्रवास**—एअर इंडिया इंटरनॅशनलनें दिल्ली ते मास्को ह्या मार्गावर ७०७ बोईंग जेट विमानें वापरण्याचें ठरविलें आहे. हा प्रवास दर आठवड्याला एकदा करण्यांत येणार आहे. मार्गावरील पहिली खेप बोईंग जेट विमानानें नुकतीच केली. प्रवासाचा मार्ग मुंबई-दिल्ली-मास्को असा आहे. अंतर ३,२६८ मैल असून तें तोडण्यास विमानाला सुमारें ७ तास लागले.

**१७ हजार मुलें शाळेबाहेर**— मुंबई कॉर्पोरेशनच्या शिक्षणखात्यानें १९६०-६१ ह्या वर्षीच्या शिक्षणविषयक अहवालांत असें नमूद केलें आहे कीं ह्या वर्षी शाळेंत जाण्याच्या वयाचीं १७ हजार मुलें शाळेंत गेलीं नाहींत. घरकामांत मदत करणें, पैसे मिळवणें, पाठ्यपुस्तकें नसणें, इत्यादी कारणें गैरहजेरीसाठी देण्यांत आलीं आहेत. वास्तविक ह्या मुलांना शाळेंत जाण्याची सक्ति होती.

**हिंदी वैद्यकशास्त्राची पाहाणी**— अमेरिकेंतील जॉन हॉपकिन्स विद्यापीठातर्फे भारतामधील आयुर्वेदीय व युनानी औषधपद्धतींची पाहाणी करण्यांत येणार आहे. पाहाणी करण्याचें काम लवकरच सुरू होईल. कॅलिफोर्निया कॉलेजमधील समाजशास्त्राच्या एका प्राध्यापकाची ह्या कामासाठी नेमणूक करण्यांत आली आहे. भारतामधील आयुर्वेदीय व युनानी पद्धतीच्या वैद्यकीय केंद्रांना ते भेटी देणार आहेत.

**चित्रपटांसाठी कर्ज**— फिल्म फायनॅन्स कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांनीं असें जाहीर केलें कीं, दोन भारतीय भाषांतील चित्रपट काढण्यासाठी कॉर्पोरेशननें ६ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. हे चित्रपट खाजगी निर्मात्यांतर्फे काढण्यांत येणार आहेत. चित्रपटांचीं नांवें लवकरच जाहीर करण्यांत येतील. कॉर्पोरेशनच्या डायरेक्टरांच्या सभेंत वरील निर्णय घेण्यांत आला.

**डॉक्टरांच्या तुटवड्याचा परिणाम**— जालंदर सिव्हिल इस्पितळांतील एका नव्या विभागाचें उद्घाटन करतांना पंजाबचे आरोग्यमंत्री म्हणाले कीं पंजाबमध्यें डॉक्टरांचा अतिशय तुटवडा आहे. त्यामुळें इस्पितळांत काम करणाऱ्या एका नेत्रवैद्याला क्षयरोग तज्ज्ञांचें काम करण्याची पाळी आली.

**क जीवन सत्वाचें उत्पादन**—पिंपरी येथील औषधाच्या कारखान्यांत क जीवनसत्वाचें उत्पादन करण्याची योजना भारत सरकारनें मंजूर केली आहे. ह्या योजनेसाठी ६० लाख रुपये खर्च येणार असून त्यांपैकी ३३ लाख रुपये यंत्रसामग्रीसाठी लागणार आहेत. कारखान्यांत दरसाल ४८ टन क जीवनसत्व तयार करण्यांत येईल.

**गुजरातमध्यें सहकारी शेतकी संस्था**—राजकोट जिल्ह्यांत तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत २० सहकारी शेतीच्या संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. सर्व संस्थांत मिळून ४ हजार एकर जमीन सामील करण्यांत येईल. ह्या संस्थांना मदत, कर्जें व भांडवल पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. एक जिल्हा सहकारी कमिटीहि स्थापन करण्यांत आली आहे.

**बक्षीस रोख्यांची विक्री बंद**—जुलै, १९६२ च्या प्रारंभापासून बक्षिसांच्या रोख्यांची विक्री बंद करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. रोख्यांच्या खरेदीबाबत लोकांचा फारसा उत्साह दिसून न आल्यानें हा निर्णय घेण्यांत आला. १९६०-६१ सालीं १५·७५ कोटी रुपयांचे बक्षीस रोखे खपले होते. १९६१-६२ मध्यें ह्या रोख्यांची विक्री अवघी २·८३ कोटी रुपयांची झाली.

**अणुबॉबचें युद्ध झालें तर**—अणुबॉबचें युद्ध झालें तर सुमारें १ कोटी लोकांना सुरक्षित ठिकाणीं हलविण्याच्या योजनेचा तपशील ब्रिटिश सरकारनें जाहीर केला आहे. ज्या शहरांतून व परगण्यांतून लोकांना हलविण्यांत येईल, त्यांची यादी तयार करण्यांत आली आहे. लंडन शहरांतून सर्वांत अधिक लोकांना हलवावें लागेल.

**गोव्यांत चंदेरी साड्या**—गोव्यांत अलीकडेच एक खादीभांडार उघडण्यांत आलें आहे. ह्या भांडारांत हातमागावर काढलेल्या चंदेरी व महेश्वरी साड्या लवकरच मिळूं लागतील. मध्यप्रदेशाच्या खादी व ग्रामोद्योग संघटनेच्या अध्यक्षांना साड्या तयार करणाऱ्या केंद्रांना पुरवठा करण्याबद्दल सूचना दिल्या आहेत. ह्या साड्या महाराष्ट्रांत व गुजरातेंत फार लोकप्रिय आहेत.

**दूधपुरवठ्याची सहकारी संस्था**—नगरमध्यें काढण्यांत येणाऱ्या सहकारी दूध-पुरवठा संस्थेच्या इमारतीचा पायाभरणीसमारंभ नुकताच झाला. संस्थेच्या गौळवाड्यासाठी नगर-मनमाड रोडवर १·५० लाख रुपये खर्चून इमारत बांधण्यांत येत आहे. दूध जंतुरहित करण्यासाठी व बाटल्यांत भरण्यासाठी १ लाख रुपयांची यंत्रसामग्री बसविण्यांत येणार आहे.

**एकाकी जीवन असह्य**—दिल्लीमधील सचिवालयाच्या वाचनालयांत काम करणाऱ्या एका मुलीनें इमारतीच्या छपरावरून उडी टाकून आत्मघात करण्याचा प्रयत्न केला. ही मुलगी २२ वर्षांची असून गेल्या कांहीं महिन्यांत तिचे आईबाप व भाऊ एका मागून एक मृत्युमुखीं पडले होते. एकटेपणाचा कंटाळा येऊन तिनें हा प्रकार केला, अशी पोलिसांची माहिती आहे.


**छोट्या उद्योगधंदेवाल्यांची संघटना** गुजरात राज्यांतील उद्योगधंदेवाल्यांनीं आपली एक संघटना स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी येत्या जूनमध्यें अहमदाबादमध्यें एक परिषद भरविण्यांत येणार आहे. परिषदेला राज्यांतील छोट्या उद्योगधंद्यांचे ५०० प्रतिनिधी उपस्थित राहाणार आहेत. गुजरात राज्यांत १,२०० पेक्षा अधिक छोटे कारखाने आहेत. त्यांच्यापुढील प्रश्नांची सोडवणूक करण्यास साह्य करण्याचा संघटनेचा हेतु आहे.


**पूर्व पाकिस्तानांतील धरण**—पूर्व पाकिस्तानांत चितगांवपासून ४० मैलांवर बांधण्यांत येणाऱ्या कर्णफुली धरणाच्या बांधकामास प्रारंभ करण्यांत आला आहे. ह्या धरणासाठी अमेरिकेनें पाकिस्तानला ८ कोटी डॉलर्सची मदत दिलेली आहे. धरणाला एकूण सुमारें ४९ कोटी रुपये खर्च येणार आहे. धरणामुळें भारताची कांहीं जमीन बुडाल्यास नुकसानभरपाई देण्याची तयारी पाकिस्ताननें दाखविली आहे.

**ग्रामीण भागांचा विकास**—कैरो येथें भरलेल्या आफ्रिकी-आशिआई देशांच्या परिषदेंत आफ्रिकेंतील व आशियांतील ग्रामीण भागांचा विकास करण्यासाठी एक खास संघटना स्थापन करण्यांत आली. संघटनेंत आतांपर्यंत भारत, जपान, लिबिआ, मलाया व संयुक्त अरब संघटना ह्यांनीं भाग घेतला आहे. ह्या संघटनेचें अध्यक्षपद इजिप्तच्या एका नागरिकाकडे राहील. संघटनेची तात्पुरती कचेरी दिल्ली येथें ठेवण्यांत येणार आहे.

**रशियाच्या मदतीनें इस्पितळ**— नेपाळची राजधानी खाटमांडू येथें रशियाच्या मदतीनें ५० खाटा असलेलें एक इस्पितळ काढण्यांत आलें आहे. इस्पितळांत काम करण्यासाठी कांहीं रशियन डॉक्टर्स लवकरच येणार आहेत. ह्या कामाशिवाय नेपाळमध्यें रशियाच्या मदतीनें एक साखरेचा कारखाना, एक सिगारटेचा कारखाना व एक छोटें वीजकेंद्रहि स्थापन करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

किर्लोस्कर
स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट

भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)



बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गिरगांव, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# अर्थ

बुधवार, ता. १८ एप्रिल, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेच्या खपांत वाढ होण्याचा संभव

१९६१ च्या डिसेंबर महिन्यांत साखरेवरील निर्बंध काढून टाकल्यापासून देशांतील साखरेचा खप हळुहळु वाढत चाललेला आहे. चालू वर्षी साखरेच्या अंतर्गत खपांत आणखी बरीच वाढ होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षी देशांत सुमारें २१ लाख टन साखर खपली होती. ह्या खपांत आणखी १५ ते २० टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. गेल्या कांहीं वर्षांत साखरेचें उत्पादन वाढत चाललेलें आहे. हें उत्पादन वाढतां वाढतां गेल्या वर्षी साखरेच्या खपाची परिस्थिति बरीच बिकट झाली. ह्या अडचणीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी दोन मार्गांनीं प्रयत्न करण्यांत आले. देशांतील साखरेचा खप वाढविण्याची कोशीस करण्यांत आली आणि त्याचबरोबर साखरेची परदेशीं होणारी निर्यातहि वाढविण्यांत आली. निर्यात वाढविण्याचे प्रयत्न अजूनहि होत आहेत. भारत सरकारनें कॅनडाशीं दोन ऐनजिनसी देवाण-घेवाणीचे करार केले आहेत. ह्या कराराप्रमाणें भारत कॅनडाला ७०,००० टन साखर पुरविणार असून भारत कॅनडाकडून रासायनिक खतें घेणार आहे. रासायनिक खतांची भारताला सध्यां फार गरज आहे. भारताची साखर अमेरिकेशिवाय मलाया, ब्रह्मदेश, पश्चिम आशियांतील देश, ह्यांनाहि निर्यात करण्यांत येते. ह्या देशांशिवाय आणखी परदेशीय बाजारपेठा मिळविण्याची खटपट करण्यांत येत आहेच. अमेरिकेजवळ शिल्लक पडून राहिलेला शेतीचा माल घेण्याची तयारी असलेल्या देशांकडून साखर आयात करण्याची तयारी अमेरिकेनें दाखविली आहे. भारतामधील साखरेच्या बाजारपेठेंतील किंमती आतां कांहींशा स्थिरावल्या आहेत. चांगल्या प्रतीच्या साखरेची किंमत तर पूर्वीपेक्षा थोडीशी वाढलेलीच आहे.

---

## चहाची निर्यात वाढविण्यासाठी प्रयत्न हवेत

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत दरसाल ९० कोटी पौंड चहाचें उत्पादन करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गांठावयाचें असेल तर सध्यांच्या उत्पादनांत १५ ते २० कोटी पौंडांची भर पडणें आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेनें केलेल्या अंदाजाप्रमाणें जगांतील चहाचें उत्पादन आणि त्याचा खप ह्यांच्यांत समतोलपणा राहिलेला नाहीं. चहाचें उत्पादन वाढत आहे. पण त्याचा खप मात्र त्या प्रमाणांत वाढत नाहीं. त्यामुळें मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ सहाजिकच बसत नाहीं. जगांत १९६० सालीं १५४·४ कोटी पौंड चहाचें उत्पादन झालें व खप १५४·२ कोटी पौंड झाला असा अंदाज करण्यांत आला आहे. भारतामधील चहाचा खप दरसाल सुमारें १·५ कोटी पौंडांनीं वाढत आहे. असें असलें तरी सुद्धां भारताच्या चहाची निर्यात करण्यसाठी अधिक प्रयत्न होणें आवश्यक आहे. ब्रिटन युरोपियन कॉमन मार्केटचा सभासद झाला, तर चहाच्या निर्यातीवर विपरीत परिणाम होईल अशी भीति व्यक्त करण्यांत आलेली आहे. परंतु ह्या भीतींत फारसा अर्थ नाहीं असेंहि मत तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. उलट, युरोपियन कॉमन मार्केटमुळें युरोपीय देशांची आर्थिक भरभराट होईल व भारताच्या चहाच्या निर्यातीला चांगली चालना मिळेल, अशीहि शक्यता आहे. ब्रिटिश बेटें सोडून युरोपखंडाच्या मुख्य भूमीवर चहानें अद्याप लोकांच्या आवडीची पकड घेतलेली नाहीं. जर्मनी, फ्रान्स, इटली, ह्या देशांतून तर चहामुळें डोकें दुखतें आणि झोप उडते असाहि समज प्रचलित आहे. चहाची निर्यात वाढविण्यासाठी ह्या गैरसमजांचें निराकरण करण्यांत आलें पाहिजे. इंडियन टी बोर्डानें ह्या दृष्टीनें प्रयत्न चालविले असून त्यांना यशहि येत आहे. तथापि प्रचारासाठी लागणारा पैसा अपुरा पडत असल्यानें चहाच्या प्रचारालाच मर्यादा पडत आहेत.

---

## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील तेलाचें उत्पादन

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत खनिज तेलाच्या शोधासाठी प्रथम ११५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. परंतु आतां ती २०२ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यांत आली आहे. तेल आणि नैसर्गिक वायुमंडळाला आतांपर्यंत लाभलेल्या यशाचा हा परिणाम आहे. मंडळानें आतांपर्यंत तीन तेलक्षेत्रांचा शोध लावला आहे. त्यांपैकीं दोन गुजरातमध्यें व एक आसाममध्यें आहे. तेलाचा शोध घेण्याच्या कामीं परदेशांचें साह्य घ्यावें लागतें. अर्थातच परदेशीय चलनाची तरतूद करावी लागते. नियोजन समितीनें प्रथम ५३ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मंजूर केलें होतें. परंतु ही रक्कम वाढवून ६३ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मंजूर करण्यांत आलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ६० लाख टन अशुद्ध तेल निर्माण करण्यांत येईल असा समितीचा अंदाज आहे.

---

## टेलिव्हिजनवरील दृश्यांचा मुलांवर होणारा परिणाम

टेलिव्हिजनवर दाखविण्यांत येणाऱ्या दृश्यांचा मुलांच्या वागणुकीवर काय परिणाम होतो ह्याची छाननी करण्यासाठी एक चौकशी मंडळ नेमण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. ह्या चौकशीसाठी २ लाख पौंड खर्च येणार आहे. सुप्रसिद्ध ब्रिटिश कादंबरीकार चार्लस डिकन्स ह्याच्या ऑलिव्हर ट्विस्ट ह्या कादंबरीचें टेलिव्हिजनवर चित्रीकरण करण्यांत आलें. कादंबरींतील एक खुनाचा प्रसंग मुलांच्या कार्यक्रमांत दाखविण्यांत आला. त्यावरून पार्लमेंटमध्यें प्रश्नोत्तरें होण्यापर्यंत मजल गेली, आणि टेलिव्हिजनवर गुन्हेगारांचीं हिंसक कृत्यें दाखवावीत कां नाहीं, असा वाद सुरू झाला. अशा प्रकारचीं दृश्यें पाहून मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतो आणि त्यांची गुन्हेगारीकडे प्रवृत्ति होऊं लागते, असें आक्षेपकांचें म्हणणें आहे.

## टोकिओ शहराचा भाग खचत चालला

टोकिओ शहरांतील आग्नेय दिशेकडील कांहीं भाग खचू लागल्यानें तेथील कारखान्यांना धोका निर्माण झाला आहे. ह्या भागांत १२० कारखाने असून त्यांत लक्षावधी कामगार काम करीत असतात. गेल्या ४० वर्षांत हा भाग ३९ इंच खचल्याचें आढळून आलें आहे. अलीकडे जमीन खचण्याची ही क्रिया वाढत्या वेगानें होत आहे. आतां हा भाग दरसाल ८ इंचांनीं खचत चालला आहे. समुद्रसपाटीपासून हा भाग खालच्या पातळीवर असल्यानें पावसाचें व कारखान्यांतुन वापरलेलें पाणी सांठून राहतें. पाणी उपसून काढण्यासाठी विजेचे पंप तेथें सारखे चालू असतात. परंतु वादळी पावसाचा संभव दिसतांच ह्या भागांतील सर्वांना बाहेर पडावें लागतें. कारण, वादळी पावसाचें पाणी उपसून काढणें अशक्यच असतें.

## भूतानमध्यें कोळशाच्या खाणी

भूतान राज्याची भूगर्भविषयक पहाणी करण्यासाठी भारतीय शास्त्रज्ञांची एक तुकडी तिकडे गेली होती. तुकडीनें केलेल्या खनिज द्रव्याविषयक पाहाणीवरून असें दिसून आलें आहे कीं राज्याच्या ईशान्य भागांत कोळशाचें साठे विपुल प्रमाणांत आहेत. कोळशाशिवाय तांबें, शिसें, इत्यादि धातू सांपडण्याचाहि संभव आहे. कोळसा सांपडणाऱ्या भागांतून चालू पंचवार्षिक कार्यक्रमांत ४०,००० टन कोळसा निघूं शकेल. कोळशाच्या खाणींसाठी लागणारी यंत्रसामग्री भारतामधून भूतानला नेण्यांत येईल. खाणींतून कोळसा काढण्याच्या कामास लवकरच प्रारंभ होईल. उपलब्ध झालेला कोळसा आसामधील चहाच्या मळेवाल्यांना व बोट-वाहतूक कंपन्यांना पुरविला जाईल.

## दुर्गापूर पोलाद कारखान्याचा विस्तार

दुर्गापूर येथें काढण्यांत आलेल्या पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी ब्रिटनकडून २ कोटी पौंड, म्हणजे सुमारें २६ कोटी रुपयांचें कर्ज मिळणार आहे. ह्यासंबंधींच्या करारावर लवकरच सह्या होतील. कर्ज दीर्घ मुदतीचें असेल. कर्जाच्या करारावर सह्या झाल्यावर विस्ताराचें काम पार पाडण्यासाठी ब्रिटनमधील एंजिनिअरिंग कारखान्यांकडून टेंडर्स मागविण्यांत येतील. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पूर्तीसाठी ब्रिटननें आतांपर्यंत ९ कोटी पौंडांची कर्जाऊ रक्कम देण्याचें कबूल केलें आहे. त्यापैकी ४॥ कोटी पौंड रक्कम कशी वापरावी ह्याबद्दल उभयतां सरकारांनीं निर्णय घेतलेले आहेत. बाकीची रक्कम वापरण्याबद्दल भारत सरकार ब्रिटनशीं वाटाघाटी करीत आहे. ह्या रकमेपैकीं बराच मोठा भाग औद्योगिक कच्चा माल व यंत्रसामग्री आयात काण्यासाठी खर्च करण्याची शक्यता आहे.

## रामकृष्ण मिशनचें कार्य

मुंबईला खार येथें रामकृष्ण मिशन ह्या संस्थेनें एक इस्पितळ चालविलेलें आहे. इस्पितळांत रोग्यांना फुकट औषधोपचार केला जातो. संस्थेंत ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक व आयुर्वेदिक अशा तिन्ही प्रकारच्या उपचारपद्धति वापरण्यांत येतात. संस्थेच्या वैद्यकीय मदतीचा लाभ दरसाल सुमारें २ लाख रोगी घेतात. संस्थेच्या १९५९ व १९६० च्या अहवालांत ही माहिती देण्यांत आली आहे.

## भारताला खरी भीति आर्थिक संकटाची आहे

अमेरिकेंतील भारताचे वकील श्री. बी. के. नेहरू डेन्व्हर विद्यापीठांत बोलतांना म्हणाले - कीं, कोणत्याहि राष्ट्रगटांत सामील न होण्याचें भारताचें धोरण बळकट कारणावर आधारलेलें आहे. तटस्थ राहणाऱ्या पूर्वेकडील देशांना लष्करी आक्रमणाचें भय असतें तर त्याचें निराकरण लष्करी करारांनीं करतां आलें असतें. पण लष्करी आक्रमणाचें भय खरें नाहीं. खरा धोका आहे तो भारतीय सरकार व त्यानें अंगिकारलेली लोकशाही पद्धति अयशस्वी होण्याचा आहे. लोकांच्या मूलभूत आर्थिक गरजा भागविण्याच्या कामीं भारताच्या लोकसत्ताक सरकारला अपयश आलें तर मात्र परिस्थिति स्फोटक होईल. तेव्हां मूळ धोकाच जर आर्थिक स्वरुपाचा आहे तर त्यावरील उपाययोजना लष्करी स्वरुपाची असून चालणार नाहीं हें उघड आहे.

## विनातिकिट प्रवास करणारे उतारू

उत्तर रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं विनातिकिट प्रवास करणारे उतारू पकडण्यासाठी उत्तर प्रदेशांत एक मोहीम काढली होती. ह्या मोहिमेंत एका दिवशीं ३०० लोकांना अटक करण्यांत आली. अटक झालेल्या लोकांत शिक्षक, विद्यार्थी, रेल्वेचे नोकर, पोलिसदलांतील लोकहि होते. विशेष म्हणजे पहिल्या वर्गानें प्रवास करणारे एक मॅजिस्ट्रेटहि ह्या मोहिमेच्या जाळ्यांत सांपडले. ह्यासंबंधीं बोलतांना रेल्वेचा एक अधिकारी म्हणाला कीं, समाजांतील वरिष्ठ वर्गाचे लोकच ह्या बाबतींत अधिक दोषी आहेत. त्यांच्या मानानें खेड्यांतील लोक बरेच प्रामाणिक आढळतात. उत्तर रेल्वेच्या लखनौ विभागांत विनातिकिट प्रवास करणाऱ्या उतारूंपासून दरमहा सुमारें ६०,००० रुपये दंडादाखल वसूल करण्यांत येतात.

## बेडकांच्या निर्यातीमुळें धोका

केरळामधून बेडकांची निर्यात मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत असून त्यामुळें सार्वजनिक आरोग्याला धोका पोंचण्याचा संभव आहे. बेडूक हा प्राणी डांसाच्या अंड्यांवर व आळ्यांवर जगतो. त्याचप्रमाणें हत्ती रोगाचे जंतूहि त्याच्या भक्ष्यस्थानीं पडतात. बेडकांची संख्या प्रमाणाबाहेर घटल्यास हे दोन्ही रोग जोरानें उफाळण्याचा संभव आहे. बेडूक मुख्यत: अमेरिकेला निर्यात करण्यांत येतात. खाद्यपदार्थ म्हणून त्यांचा उपयोग होतोच; पण त्याशिवाय वैद्यकीय प्रयोगासाठींहि ते वापरले जातात. अलीकडे पश्चिम युरोपांतील देशांकडूनहि बेडकांची मागणी करण्यांत येऊं लागली आहे. बेडकांच्या निर्यातीनें परदेशीय चलनाची प्राप्ति होते.

## अन्नधान्याच्या आयातीचा परिणाम

गेलीं एक–दोन वर्षें चीनमधील अन्नधान्यांचें उत्पादन अनेक नैसर्गिक व सामाजिक कारणांनीं घटत आहे. त्यामुळें चीनला परदेशाकडून अन्नधान्याची आयात करून दुष्प्राप्य असें परदेशीय चलन मोठ्या प्रमाणावर गमवावें लागत आहे. १९६१सालांत चीननें परदेशांकडून ९० लाख टन अन्नधान्य आयात केलें व त्यासाठी ४५ कोटी डॉलर्स दिलें. चीनच्या परदेशीय चलनाच्या सांठ्यांत मोठी घट झाली असून व्यापारी पिकांचें उत्पादनहि कमी झालें आहे. त्यामुळें चीनच्या छोट्या उद्योगधंद्यांतील उत्पादनावरहि विपरीत परिणाम झाला आहे. चीनमधील शेतीचें उत्पादन वार्षिक सरासरी उत्पादनापेक्षा अधिक असणार नाहीं, असा खुद्द चीनच्या सरकारचाच अंदाज आहे.

## दिल्ली येथील विमानें उतरण्याची धसरपट्टी

दिल्ली येथील पालम विमानतळावर विमानें चढण्या-उतरण्याची एक नवी घसरपट्टी बांधण्यांत आली आहे. ह्या घसरपट्टीची लांबी १०,५०० फूट असून बांधण्यासाठी १३२ लाख रुपये खर्च आला. ती पूर्ण होण्यास २ वर्षे लागलीं. अलीकडे आंतरराष्ट्रीय विमान-वाहातुकींत जेटवर चालणारीं प्रचंड विमानें वापरण्यांत येत असतात. ह्या विमानांना पूर्वी बांधण्यांत आलेल्या घसरपट्ट्या अपुऱ्या पडूं लागल्या. म्हणून मुंबई, कलकत्ता, मद्रास व दिल्ली ह्या शहरांतील घसरपट्ट्या नव्यानें बांधण्याचा कार्यक्रम भारत सरकारनें हातीं घेतला आहे. हा कार्यक्रम क्रमशः पार पाडण्यांत येणार असून त्यासाठी ८ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. दिल्ली येथील नवी घसरपट्टी ह्याच कार्यक्रमाचा एक भाग आहे. ह्या घसरपट्टीची कल्पना व बांधणी हीं दोन्हीं कामें हिंदी एंजिनिअर्सनीं पार पाडलेलीं आहेत. आशिआंतील सर्वांत लांब घसरपट्टी असा तिचा लौकिक सांगण्यांत येत आहे. तिची रुंदी २५० फूट असून त्यांपैकी मधला १५० फुटांचा पट्टा जेट विमानांचें सर्व वजन सहन करण्यासारखा मुद्दाम बनविण्यांत आला आहे. घसरपट्टीच्या दोन्हीं टोंकांना १,००० फूट लांबीची आणखी एक पट्टी ठेवण्यांत आली आहे. एखादे वेळीं विमान योग्य त्या ठिकाणीं न थांबल्यास ह्या जादा पट्टीचा उपयोग करतां येईल. ही जादा पट्टी जमेस धरल्यास घसरपट्टीची एकूण लांबी २.४ मैल होईल. घसरपट्टीच्या खालून एक भुयारी मार्ग काढण्यांत आला आहे. वरती विमानतळावर हालचाली चालू असल्या तरी पादचाऱ्यांना आणि हलक्या वाहनांना ह्या मार्गाचा उपयोग करतां येईल. भुयारी मार्गांत हवा व उजेड ह्यांची चांगली सोय करण्यांत आली आहे. हिंदी तंत्रज्ञांनीं केलेल्या चांगल्या कामाचा एक नमुना म्हणून त्याकडे बोट दाखवितां येईल.

## नेवेली येथील वीज उत्पादन-केंद्र

नेवेली येथें रशियाच्या मदतीनें बांधण्यांत येत असलेल्या वीज उत्पादन केंद्राचें काम थोडे लांबणीवर पडलें आहे. केंद्रांत बसविण्यांत येणाऱ्या ५०,००० किलोवॅट वीज उत्पादन करणाऱ्या यंत्रसामग्रीचे कांहीं भाग रशियाकडून अद्याप आलेले नाहींत. त्यामुळें फेब्रुवारी, १९६२ पासून उत्पादन करण्यांत यावयाची वीज आतां मे अखेर पासून निर्माण करण्यांत येईल असा अंदाज आहे. मॉस्कोमधील भारतीय वकिलातीतर्फे उरलेली यंत्रसामग्री लवकर मिळविण्याविषयीं प्रयत्न करण्यांत येत आहेत. जरूर तर विमानानें यंत्रसामग्री आणण्याची खटपट चालू आहे. नेवेली येथील वीजउत्पादन वाढवून तें ४ लाख किलोवॅटपर्यंत नेण्याचा विचार चालू आहे. ह्यासंबंधीची एक योजना मध्यवर्ती पाणी व शक्ति मंडळामार्फत रशियन सरकारकडे पाठविण्यांत आली आहे.

## देवकरण नानजी बँकेला भांडवल उभारणीस मंजुरी

दि कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज यांनीं चार कंपन्यांस मिळून आणखी ८८ लाख रुपये भांडवल उभारणीस मंजुरी दिली आहे. यांत मुंबईची देवकरण नानजी बँकिंग कंपनी ( ५० लाख रुपये ) व कॅप्सुलेशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ( ३,०२,४०० रुपये ), जयपूरची जयपूर मेटल्स ॲण्ड इलेक्ट्रिकल्स लिमिटेड ( २५ लाख रुपये ) व कालिकतची वेस्ट इंडिया स्टील कंपनी प्रायव्हेट लिमिटेड ( १० लाख रुपये ), या चार कंपन्यांचा समावेश होतो.

## जपानी स्त्रिया पूर्वीसारख्या राहिल्या नाहींत

जपानी स्त्रिया म्हणजे शालीनतेची व विनयाची मूर्ति, असा समज आहे; आणि कांहीं वर्षांपूर्वीपर्यंत वस्तुस्थितीहि तशीच होती. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर ही परिस्थिति झपाट्यानें पालटूं लागली व अजूनहि पालटत आहे. किमोनो हा लांब झगा घालून पतीच्या पाठीमागून ३ पावलें चालणारी जपानी स्त्री आतां फारशी दिसणार नाहीं. निदान शहरांतून तरी अशी सांपडणें अशक्यच आहे. सर्वच जपानी स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मागत आहेत आणि मिळवत आहेत. जपानमधील एका मासिकानें २,००० कुटुंबांची पाहाणी केली असतां असें आढळून आलें कीं ५० टक्के पती आपल्या पत्नीच्या तालावर नाचत असतात; नव्हे तसें करणें त्यांना भागच पडतें. १५ डॉलर्सपेक्षा अधिक किंमतीची खरेदी करावयाची असल्यास ९२ टक्के पती खरेदीचा निर्णय आपल्या पत्नीकडे सोंपवितात. ६५ टक्के पती ह्याहिपेक्षा कमी किंमतीच्या खरेदी पत्नीच्या मनाप्रमाणें करतात; ८५ टक्के जपानी पती आपल्या बुटाला स्वतःच पॉलिश चढवतात; ७८ टक्के पती स्वतःचा नास्ता स्वतःच बनवितात; आणि रात्रीं १० च्या पुढें घराबाहेर राहावयाचें असेल तर ७५ टक्के पती आपल्या पत्नीला तशी आगाऊ सूचना देतात. ५ पतींपैकी चौथे आपल्या पगाराचा चेक पत्नीच्या हातीं देऊन मोकळे होतात. जपानी स्त्रिया आपले लांब काळे केस आतां पाश्चात्य पद्धतीप्रमाणें कापू लागल्या आहेत. त्यांना वाटल्यास केसांना तांबडा अगर सोनेरी रंग देण्यासहि त्या कमी करीत नाहींत. त्या धूम्रपान करतात, दारू पितात आणि सार्वजनिक ठिकाणीं खातात. खाजगी मोटारी अगर भाड्याच्या मोटारी त्या चालवतात. जपानमध्यें वेश्याव्यवसाय फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. परंतु स्त्रियांमध्यें आपल्या हक्काची जाणीव झाल्यामुळें आतां तो झपाट्यानें कमी होत आहे.

## विषबाधा झाल्यास खास फोनची व्यवस्था

ब्रिटनच्या आरोग्य खात्यानें, कोणत्याहि कारणानें विषबाधा झाल्यास त्याची वर्दी डॉक्टर्सना ताबडतोब मिळावी म्हणून खास फोन नंबर राखून ठेवण्याची सूचना केली आहे. ब्रिटनमध्यें निरनिराळ्या प्रकारांनीं विषबाधा होऊन दरसाल ५,००० माणसें मृत्युमुखीं पडतात अशी माहिती अधिकृत रीत्या प्रसिद्ध करण्यांत आली आहे. गेल्या कांहीं वर्षांत ब्रिटनमधील बाजारांत अनेक प्रकारचीं विषमय औषधें आलेलीं आहेत. कीटकनाशक द्रव्यें, सौंदर्यप्रसाधनें, घरगुती वापरासाठी उपयोगांत आणला जाणारा गॅस, इत्यादींच्या वाढत्या प्रसारामुळें ब्रिटनमध्यें दरसाल २०,००० लोकांना विषबाधा होते. हा आकडा रस्त्यावर होणाऱ्या अपघातांच्या संख्येइतका जवळजवळ आहे. विषबाधा झालेल्या लोकांची वर्दी डॉक्टर्सना लवकर पोंचली, तर बऱ्याच लोकांना वांचवितां येईल.

## मॉस्कोमधील संगीतस्पर्धा

मॉस्कोमध्यें आंतरराष्ट्रीय संगीताची एक स्पर्धा भरविण्यांत आली होती. त्यांत २२ देशांच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला. स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यासाठी संगीततज्ज्ञांचें एक मंडळ नेमण्यांत आलें होतें. त्यांत भारतामधील प्रा. पी. सांबमूर्ति हे एक होते. ते रशिआचा तीन आठवड्यांचा दौरा करणार आहेत. दौऱ्यांत भारतीय संगीताविषयीं ते कांहीं व्याख्यानें देतील.

## पुण्यांतील ४ अर्बन को. बँकांतर्फे
# ६८५ पूरग्रस्तांना १० लाख रुपयांवर मदत

पुण्यांतील पूरग्रस्तांस त्यांच्या पुनर्वसनासाठी वेगवेगळ्या संस्था व मंडळ्या आपआपल्यापरीनें मदत करीत होत्या. याच भावनेनें प्रेरित होऊन कांहीं नागरी सहकारी बँकांनीं आपल्या आर्थिक कुवतीनुसार पूरग्रस्तांसाठी लांब मुदतीची कर्जरूपी मदत देण्याची तयारी मा. रजिस्ट्रारसाहेब यांस दर्शविल्यावरून त्यांनींहि यासंबंधीं योजना निश्चित करण्यासाठी दि. २९-७-१९६१ रोजीं त्यांच्या कार्यालयांत एक सभा नागरी सहकारी बँकांचे कार्यकर्ते, औद्योगिक खात्याचे वरिष्ठ अधिकारी, पुण्यांतील अर्थशास्त्रज्ञ, समाजसेवक व मुंबई येथील आर्थिक मदत देऊ इच्छिणारे कार्यकर्ते इ. ची सभा बोलाविली. या सभेंत मदतीची रूपरेषा कोणत्या पद्धतीनें व कोठवर करावी हें निश्चित करण्यांत आलें. या सभेंत खालील तीन योजनांचा विचार झाला.

(१) श्री. मनुभाई भिमानी योजना.
(२) औद्योगिक खात्याची योजना.
(३) सहकारी बँकांची स्वतःची योजना.

या योजनांनुसार खालील चार नागरी सहकारी बँकांनीं कर्जपुरवठ्याची तयारी दर्शविली.

(१) पूना पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(२) कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(३) जनता सहकारी बँक लि.
(४) पूना मर्चण्टस को ऑपरेटिव्ह बँक लि.

योजनांचें स्वरूप थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे:—

**श्री. मनुभाई भिमानी योजना:—**

मुंबई येथील व्यापारी संघटना व कांहीं समाजसेवक यांनीं रु. १,२५,००० नागरी सहकारी बँकांकडे रिस्क-फंड म्हणून शें. ५ टक्के व्याजानें ठेवावे. त्याचे आधारावर रु. पांच लक्षांपावेतों कर्जें लहान-मोठ्या व्यापाऱ्यांस वा इतर व्यावसाइकांस द्यावीं. या कर्जाची परतफेड द. सा. द. शें. ७॥ टक्के दरानें १०० महिन्यांत करून घ्यावयाची आहे. प्रत्येक अर्जदाराच्या सामान्यपणें किमान गरजांचा विचार करून रु. ५०० ते ३,००० पावेतों कर्जें देण्याचें ठरविण्यांत आलें. या कामीं या बँकांना कांहीं नुकसानी आल्यास ती प्रथम रिस्क-फंडावरील व्याजांतून भरून काढावी व अखेरीस रिस्क-फंडाच्या मूळ रकमेतून खर्चा टाकावी. त्यानंतरहि राहणारी नुकसानी बँकांनीं सोसावी.

**औद्योगिक खात्याची योजना:—**

पूरग्रस्त लहान कारखानदार व कारागीर यांस रु. ५०० ते ५,००० पावेतों नागरी सहकारी बँकांनीं कर्जें औद्योगिक खात्याच्या शिफारशीनुसार द. सा. द. शें. ७ टक्के दरानें ८४ महिन्यांचे परतफेडीनें देण्याचें ठरविण्यांत आलें. या कामीं येणाऱ्या ऐन नुकसानीपैकीं दोनतृतीयांश नुकसानी सोसण्याची हमी सरकारनें पत्करली आहे.

**सहकारी बँकांची योजना:—**

कांहीं बँकांनीं आपल्या पूरग्रस्त सभासदांस श्री. मनूभाई भिमानी यांचे योजनेप्रमाणें आपल्या खेळत्या भांडवलांतून कर्ज देण्याची तयारी दर्शविली असून त्याप्रमाणें कर्जें देण्याचें ठरविण्यांत आलें. या कामीं येणारी नुकसानी त्या स्वतःच सोसणार आहेत. हीं कर्जें सामान्यतः नोकरपेशाच्या सभासदांना देण्यांत आलीं आहेत.

वरील योजना कार्यवाहींत आल्यानंतर चीफ मिनिस्टर्स रिलीफ फंड कमिटीनें एक योजना सुचविली ती अशी. वरील योजना १ व २ यांत समावेश न होणाऱ्या पुण्यांतील लहानमोठ्या पूरग्रस्त दुकानदारांस आणि व्यापाऱ्यांस रु. ५०० ते ३,००० पर्यंत कर्जें द. सा. द. शें. ७ टक्के दरानें पांच वर्षें मुदतीनें देण्यांत आलीं आहेत. या योजनेखालीं दिलेल्या कर्जांत कांहीं नुकसानी बँकांस आल्यास त्या नुकसानीच्या दोन-तृतियांश एवढी रक्कम सदर कमिटी सोसणार आहे. मात्र या योजनेखालीं दिलेल्या सर्व कर्जांच्या एकूण रकमेच्या एकचतुर्थांशपेक्षाहि एकूण नुकसानी जास्त असणार नाहीं. यासाठी वेगवेगळ्या बँकांनीं दिलेल्या कर्जांच्या एकूण रकमेच्या २५ टक्के रक्कम या कमिटीनें त्या त्या बँकांकडे ठेव म्हणून ४ टक्के दरानें ठेविली आहे.

या सर्व योजना कार्यवाहींत आणण्यासाठी एक ॲड हॉक कमिटी नेमण्यांत आली व तिचें अध्यक्षपद डॉ. ध. रा. गाडगीळ यांनीं स्वीकारलें. चिटणीसपदाची कामगिरी मा. द. दि. चितळे यांचेवर सोंपविली.

वरील योजनांचे बाबतींत या नागरी सहकारी बँकांना भांडवलाचा पुरवठा करण्याची हमी महाराष्ट्र स्टेट को. बँक लि. मुंबई या संस्थेनें पत्करली व हें भांडवल पुणें सेंट्रल को. बँक लि. चे मार्फतीनें देण्यांत येतील असें आश्वासन दिलें. तसेंच जी अखेरची ऐन नुकसानी वरील योजनांनुसार या चार बँकांना सोसावी लागेल, त्या नुकसानींतहि ५० टक्के महाराष्ट्र स्टेट को. बँक लि. नें व २० टक्के पुणें सेंट्रल को. बँक लि. नें सोसण्याचें कबूल केलें. हें येथें नमूद करणें अवश्य आहे.

वरील चार नागरी सहकारी बँकांनीं याप्रमाणें जें साहाय्य केलें तें पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

| योजनेचें नांव | कर्जदारांची संख्या | दिलेलें कर्ज रु. |
|---|---|---|
| श्री. भिमानी योजना | २९० | ५,४४,८४० |
| औद्योगिक खात्याची योजना | १४४ | २,५४,६७५ |
| चीफ मिनिस्टर रिलीफ फंड कमिटी योजना | ७६ | १,२७,३५० |
| बँकांची स्वतःची योजना | १७५ | ८३,७८६ |
| एकूण | ६८५ | १०,१०,६५१ |

वरील माहितीवरून ६८५ पूरग्रस्तांस दहा लक्षांचेवर कर्जरूपी मदत या चार नागरी सहकारी बँकांनीं केलेली असून त्यांच्या खेळत्या भांडवलाच्या मानानें त्यांनीं स्वीकारलेली ही जबाबदारी अभिनंदनीय आहे हें कोणीहि मान्य करील.

या बाबतींत आणखी एका बाबीचा उल्लेख करणें जरूर आहे ती ही कीं, वरीलपैकी योजना नं. १, नं. २ व नं. ४ अन्वयें दिलेल्या रकमेच्या एक-चतुर्थांश रक्कम परंतु रु. ५०० ते १,००० पावेतों आर्थिक मदत म्हणून त्या त्या कर्जदारांना (सबसिडी) देण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. या मदतीमुळें कर्जदारांवरील कर्जाचा भार पुष्कळच कमी होणार आहे. तसेंच कर्जावर आकारल्या जाणाऱ्या व्याजासहि कांहीं प्रमाणांत सबसिडी देण्याचा सरकार विचार करीत आहे असें समजतें यासाठी महाराष्ट्र सरकारास धन्यवाद देणें उचित आहे.

## महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद

### पुणें येथील येतें अधिवेधन

ही परिषद पुणें येथें दिनांक ५ आणि ६ मे, १९६२ रोजीं घेण्याचें ठरलें आहे. महाराष्ट्राचे मुख्य मंत्री माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं सदर परिषदेचें उद्घाटन करण्याच्या विनंतीचा स्वीकार केला आहे. परिषदेचें अध्यक्षस्थान श्री. वैकुंठलाल मेहता, अध्यक्ष, खादी आणि ग्रामीण उद्योगमंडळ, हे भूषविणार आहेत.

परिषदेपुढें चर्चेकरितां खालील विषयांची निवड केली आहे.

**१. पत-पुरवठा:**—१. खेडें, जिल्हा व राज्यपातळीवर होणाऱ्या शेती सहकारी पतपुरवठा चळवळीच्या विस्ताराचा आढावा घेणें आणि त्यांतील प्रश्नांचा विचार करणें. २. शेतीसाठीं दीर्घ मुदतीच्या पतपुरवठ्याच्या विस्ताराचा आढावा घेणें व त्यांतील प्रश्नांचा विचार करणें. ३. महाराष्ट्रांतील सहकारी शेतीच्या प्रश्नाबाबत विचार करणें.

**२. खरेदी-विक्री आणि प्रक्रिया :**—१. शेतकी पतपुरवठ्याची खरेदी-विक्रीशीं सांगड घालून सर्व पातळीवरील सहकारी खरेदी-विक्रीच्या विकासाचा व त्यांतील प्रश्नांचा विचार करणें. २. महाराष्ट्र राज्यांतील सहकारी प्रक्रियेच्या विकासाचा आणि त्यांतील प्रश्नांचा विचार करणें.

**३. औद्योगिक सहकार :**—१. पतपुरवठा, खरेदी-विक्री व सहकारी साहाय्य, यांच्या अनुषंगानें औद्योगिक सहकाराच्या विकासाचा व त्यांतील प्रश्नांचा विचार करणें. २. सहकारी पद्धतीवर चालू असलेल्या औद्योगिक वसाहती व छोटे उद्योगधंदे यांच्या विकासाबाबत व इतर प्रश्नांबाबत विचार करणें.

**४. नागरी विभागांतील सहकारी चळवळ:** — १. नागर-पतपुरवठ्याच्या चळवळीबाबत, तिची वाढ होण्याबाबत व इतर सहकार क्षेत्रांत तिची सांगड घालण्याबाबत विचार करणें. २. ( अ ) सहकारी घरबांधणी, ( ब ) ग्राहकांच्या सहकारी संस्था ( क ) सहकारी छापखाने इ. सारख्या बिगर शेती व बिगर पत-पुरवठा असलेल्या सहकारी संस्थांचा नागरविभागांत विकास होण्याबाबत व त्यांच्या प्रश्नांबाबत विचार करणें.

**५. सहकारी शिक्षण व बाकीचे विषय :**—१. महाराष्ट्रांतील सहकारी शिक्षण, प्रशिक्षण व प्रसिद्धि याबाबत असलेल्या योजनांचा आढावा घेणें. त्या चांगल्या प्रकारें कशा राबविल्या जातील याबाबत विचार करणें.

**६. सहकारी कायदा :** —१. सहकारी अधिनियम १९६० व त्याचे नियम याबाबत विचार करणें.

---

### अणुशक्तीच्या साह्यानें स्वस्त वीज

१९६५ च्या सुमारास ब्रिटनमध्यें अणुशक्तीच्या साह्यानें स्वस्त वीज निर्माण करण्यांत येऊं लागेल. ही वीज सध्यां निर्माण करण्यांत येत असलेल्या विजेइतकीच स्वस्त असेल. हा चमत्कार करून दाखविणारें अणुशक्तीवरील वीजकेंद्र बांधण्याचें काम चालू झालें आहे. अणुशक्तीवरील वीज स्वस्त करण्याच्या ह्या प्रयत्नांत ब्रिटनला यश आलें तर भारतासारख्या देशांचा विकास लवकर घडवून आणण्याच्या कामीं फार आशादायक परिस्थिति निर्माण होईल.

---

### ल्हासा–खाटमांडू रस्त्याची पाहणी


ल्हासा ते खाटमांडू ह्या रस्त्याची पाहणी करण्याचें काम चिनी तंत्रज्ञ लवकरच सुरू करणार आहेत, अशी वार्ता आहे. ह्या कामासाठीं ८ चिनी तज्ज्ञ खाटमांडूला येऊन दाखल झाले असून आणखीहि कांहीं लवकरच येणार आहेत. ल्हासा ही तिबेटची राजधानी पीकिंग शहराला रस्त्यानें व अंशत: रेल्वेनें जोडली गेलेली आहे. संकल्पित रस्ता झाल्यास खाटमांडू पीकिंगला जोडल्यासारखेंच होईल. गेल्या आक्टोबरमध्यें नेपाळचे राजे महेंद्र पीकिंगला गेले होते, त्या वेळीं वरील रस्त्यासंबंधींचा करार करण्यांत आला असें समजतें. रस्त्याचें काम पूर्ण होण्यास १९६६ ची अखेर होईल. तो बांधण्यास ४ कोटी रुपये खर्च येणार आहे. नेपाळ व चीन ह्यांच्यामधील व्यापार वाढविण्यासाठीं रस्ता बांधण्यांत येणार असल्याचें सांगितलें जात असलें, तरी त्याचें लष्करी महत्त्व सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

---

### प्राचीन माणसाचे अवशेष

म्हैसूर सरकारच्या पुराणवस्तु खात्यानें कावेरी नदीच्या कांठीं कांहीं उत्खनन चालविलें होतें. म्हैसूरपासून २० मैलांवर उत्खनन करणाऱ्या ह्या तुकडीला वयांत आलेल्या माणसाचा संपूर्ण सांगाडा सापडला असल्याचें सांगण्यांत येत आहे. हा सांगाडा खिस्तशका-पूर्वी ५,००० वर्षांइतका प्राचीन असावा असा तर्क करण्यांत आला आहे. माणूस दगडाचीं हत्यारें वापरीत होता, त्या काळचा हा सांगाडा असावा.

---


दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

आपल्या ठेवीच्या सहाय्यानें महाराष्ट्रांतील अनेक उद्योगधंदांच्या गरजा भागवित आहे

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेट, पुणें-२ तार : MAHABANK

महाराष्ट्रांत व इतरत्र सर्वत्र बँकेच्या शाखा आहेत.

alCOM.B. 02/1.

## पुणें सहकारी विद्यालय, पुणें १

( १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १ )

### को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा—डिसेंबर १९६१ चा निकाल

**पहिला वर्ग :**—बा. भ. देशपांडे, मुं. पुं. पाठक, द्वा. न. आळशी.

**दुसरा वर्ग :**—म. ब. भोळे, श. वि. चौगुले, ज. मा. दरेकर, चं. द. देशमुख, ना. क. दुधाळे, गो. अ. जाधव, ए. वि. जगताप, तु. कृ. संढागळे, दा. ना. कुलकर्णी, सि. धुं. थोरात, सु. द. वायंगणकर.

**तिसरा वर्ग :**—चं. दि. भाडुले, म. चिं. हिंगे, अ. ज. मसलेकर, म. बा. सासने, पं. द. वाईकर, ह. सो. आल्हाट, गु. वि. बेनके, कृ. वि. भुजबळ, धों. भा. बुर्डे, ज्ञा. के. डावरे, प्र. शि. ढमढेरे, ब. वा. गायकवाड, मा. कृ. गेंगे, वि. ना. जाधव, ये. ह. जंगम, मीनाक्षी ग. जोशी, ज. रा. काबरा, बा. ग. काकरे, जी. ब. कुलकर्णी, बा. म. मगर, कुसुम पां. मोकाशी, वि. आ. मुडके, पां. बा. मुकणे, शि. म. मुळे, ल. प. पाटील, र. ना. पाटील, सु. प. पाटील, वि. रा. पाटील, ज. ज. पटवर्धन, द. बा. सरडे, मु. ल. शिंदे, र. धों. तांबे, ज्ञा. ल. तनपुरे, मा. चं. तिकोने, मो. सी. व्यवहारे, श्री. प. झुंजारराव, ज्ञा. ग. गायकवाड, आ. स. पाटील, सा. शि. सोनावणे, अ. श्री. पाठक.

**टीप :**—पुढील विद्यार्थ्यांनीं अनुक्रमें पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाचें पारितोषिक मिळविलें आहे :—

| पारितोषिकाचें नांव | विद्यार्थ्याचें नांव | बक्षिसाची रकम |
|---|---|---|
| (१) सर जनार्दन ए. मदन पारितोषिक : | श्री. बा. म. देशपांडे | रु. २५ |
| (२) बॉम्बे को-ऑप. इन्शु-अरन्स सोसायटी | श्री. मुं. पुं. पाठक | रु. १५ |

परीक्षेस बसलेल्या २८ व्या शिक्षणक्रमांतील ७३ विद्यार्थ्यांपैकी ५३ विद्यार्थी सदर परीक्षेंत उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण ७२·६० टक्के आहे.

रा. धों. अभ्यंकर,<br>प्राचार्य,<br>पुणें सहकारी विद्यालय

पुणें—१<br>दिनांक ३१ मार्च, १९६२

---

### इंडियन बँक्स असोसिएशनचे नवे पदाधिकारी

श्री. तुलशीदास किलाचंद ( बँक ऑफ बरोडा )—चेअरमन.

श्री. टी. डी. कनसारा (बँक ऑफ इंडिया)—डेप्युटी चेअरमन.

श्री. सी. ई. कामथ ( कॅनरा बँक )—ऑनररी सेक्रेटरी.

श्री. एन. एम. चोक्सी ( बँक ऑफ बरोडा ), श्री. एन. के. करंजिया ( सेंट्रल बँक ऑफ इंडिया ', श्री. कमलनयन बजाज ( पंजाब नॅशनल बँक ), श्री. एम. आर. रुइया ( युनायटेड कमर्शियल बँक ), श्री. पी. व्ही. गांधी ( देवकरण नानजी बँकिंग कं. ), श्री. संजीवन बानर्जी ( युनायटेड बँक ऑफ इंडिया), श्री. सी. व्ही. जोग ( बँक ऑफ महाराष्ट्र ), आणि श्री. बी. एल. सेठी ( बँक ऑफ राजस्थान )—कमिटीचे सभासद.


## भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

**बँक लौकरच स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.**

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज-वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके

## दि बेळगांव बँक लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें, खपलेलें व वसूल भांडवल | रु. ८,००,००० |
| एकूण गंगाजळी | रु. ४,९०,००० |
| ठेवी | रु. १,८४,६९,००० |
| एकूण जिंदगी | रु. २,२२,००,००० |

**म्हैसूर आणि महाराष्ट्रांत पसरलेल्या २८ शाखा**

मुदती ठेवी आणि कॉल डिपॉझिट्स अत्यंत आकर्षक **व्याजाच्या दरानें** स्वीकारलीं जातात.

बँकेच्या तीन आणि पांच वर्षें मुदतीच्या कॅश सर्टिफिकेटांवर परतफेडीच्या वेळीं अनुक्रमें ४½% व ५% व्याज पडतें.

होम सेव्हिंग्ज ठेवी ३% दरानें स्वीकारल्या जातात.

एका वर्षाच्या आणि पांच वर्षांच्या मुदती ठेवींवर किमान व्याज अनुक्रमें ४% आणि ५%

बँकेला १९६१ सालीं २,२८,८२१ रु. १४ न. पैसे, म्हणजे पूर्वीच्या वर्षापेक्षा ५७,०९७ रु. ८३ न. पैसे जास्त नफा झाला. वाढलेल्या १०% करपात्र दरानें डिव्हिडंड वांटण्याचा बँकेचा इरादा आहे.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अ. रा. नाईक,<br>बी. ए., बी. एससी., एलएल. बी.<br>मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.